**वादीतर्फे साक्षीदार क्र.२ चा उलटतपास प्रतिवादी क्र.१ तर्फे ॲड. श्री. आर. एस. पळसपगार वकिलांमार्फत शपथेवर पुन्हा सुरू.**

२. प्रतिवादी क्र.१ च्या तोंडी मागणीवरून वादी संस्थेने त्यास कर्ज वितरीत केले होते. मी कर्जाचा मुळ अर्ज अभिलेखावर दाखल केला आहे. दावा दाखल करतेवेळी अथवा साक्षिदार क्र.१ चा पुरावा देतेवेळी सदरचे व्हाउचर अभिलेखावर दाखल न करण्याचे कोणेतेही कारण नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, साक्षिदार क्र.१ यांच्या पुराव्यातील उणिवा व कमतरता भरून काढण्यासाठी सदरचे बनावट व्हाउचर मी अभिलेखावर दाखल केले. व्हाउचर्स (निशाणी क्र.६९ ते १८४) वर संस्थेच्या संबंधीत अधिकाऱ्यांची सही व शिक्का नाही. हे म्हणणे खरे आहे की, कर्ज दिल्याची नोंद रोख पुस्तिकेत घेतल्या जाते. सदरची रोख पुस्तिका मी अभिलेखावर दाखल करू शकतो.

३. हे म्हणणे खरे आहे की, कर्जाची परतफेड ही प्रतिवादी क्र.१ च्या पगारातून विभागीय कार्यालय, अमरावती यांच्यामार्फत होते. त्याबाबतचा कर्ज कपातीचे अर्ज मी दर महिण्याला विभागीय कार्यालय, अमरावती येथे पाठविले होते. सदरच्या कपातीचे अर्ज मी अभिलेखावर दाखल केले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, व्हाउचर्सच्या आधारावर प्रतिवादी क्र.१ ला कोणतेही कर्ज न दिल्याने मी त्याबाबतच्या कपातीबाबतचे अर्ज विभागीय कार्यालय, अमरावती यांना पाठविले नसल्याने मी ते अभिलेखावर दाखल केले नाही. प्रतिवादी क्र.१ ने नेमक्या किती कर्जाची परतफेड केली, हे मी सांगु शकत नाही. व्हाउचर्सच्या आधारावर तातडीचे कर्ज प्रतिवादी क्र.१ ला देण्यात आल्याबाबतचा उल्लेख माझ्या व साक्षिदार क्र.१ च्या पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रात नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ ला तातडीचे कर्ज न दिल्यामुळे त्याबाबतचा उल्लेख माझ्या व साक्षिदार

क्र.१ च्या प्रतिज्ञापत्रात नाही. हे म्हणणे खरे नाही की, व्हाउदचर्स वर मी प्रतिवादी क्र.१ च्या खोट्या सह्या करून ते अभिलेखावर दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पुराव्यातील संपूर्ण मजकुर खोटा आहे.

( रोख पुस्तिका दाखल करण्यासाठी उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब)

समक्ष

**Sd/-**

(व्ही. व्ही. जोशी)
न्यायाधीश
सहकार न्यायालय, अकोला.

दिनांक: ०७.०७.२०२६
ठिकाण: अकोला